Title of Programme: **साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती - लेखन प्रेरणा दिन**

Name of Organizing Department : **मराठी विभाग**

Name of the Coordinator of the Programme: **डॉ. संजय शिंदे**

Date of the Programme : १/८/२०२६

Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

Target Group : **विद्यार्थी**

Number of Participants: ३४०

Name of Resource Person : **संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील साहेब**

Total Expenditure for the Programme: - १५००/-

Source of Funding: - **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**Report: साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती व लेखन प्रेरणा दिन**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण करून त्यांचा जन्मदिवस ‘लेखन प्रेरणा दिन’ म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून दलित, शोषित, कष्टकरी आणि कामगारांच्या व्यथा मांडल्या. त्यांचे साहित्य जीवनवादी होते. उपेक्षितांचे अंतरंग समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी अण्णा भाऊ साठे यांची ‘फकिरा’ ही कादंबरी आवर्जून वाचावी, असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे आणि प्रा. वैभवी कोपर्डे उपस्थित होते.

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, त्यांच्या लेखनातून सामाजिक वास्तवाचे भान निर्माण व्हावे आणि विद्यार्थ्यांच्या लेखनविषयक क्षमतांना चालना मिळावी, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ‘एकदा काय झालं...’ या विषयावर कथालेखन स्पर्धा, ‘माझे सामाजिक योगदान’ या विषयावर निबंध स्पर्धा तसेच अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे अभिवाचन इत्यादी उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमांमध्ये कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

HRM

**‘एकदा काय झालं…’ या कथालेखन स्पर्धेत** प्रथम क्रमांक – सुप्रिया ठोकळ, द्वितीय क्रमांक – दिक्षा जाधव, तृतीय क्रमांक – विद्या गावडे तर **‘माझे सामाजिक योगदान’ या निबंध स्पर्धेत** प्रथम क्रमांक – ज्ञानेश्वरी मेदगे, द्वितीय क्रमांक – प्रतीक्षा कुडेकर, तृतीय क्रमांक – अक्षदा अरगडे यांचा आला. स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुस्तक भेट देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि विविध साहित्यिक उपक्रमांमुळे अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाचे स्मरण करणारा हा कार्यक्रम अर्थपूर्ण व प्रेरणादायी ठरला.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.



गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुस्तक भेट देताना मान्यवर

पुढारी

# 'अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य जीवनवादी'

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी त्यांच्या साहित्यातून दलित, शोषित, कष्टकरी, कामगारांची व्यथा मांडली. त्यांचे साहित्य जीवनवादी होते, असे मत खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी व्यक्त केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, डॉ. बाळासाहेब अनुसे, प्रा. वैभवी कोपर्डे उपस्थित होते.

मराठी विभागाच्या माध्यमातून साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानाचे स्मरण करताना त्यांचा जन्मदिवस लेखन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. या निमित्ताने 'एकदा काय झालं...' या विषयावर कथालेखन स्पर्धा, 'माझे सामाजिक योगदान' या विषयावर निबंध स्पर्धा, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे अभिवाचन इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कथालेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक सुप्रिया ठोकळ, द्वितीय क्रमांक दिक्षा जाधव तर तृतीय क्रमांक विद्या गावडे यांनी पटकावला. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक ज्ञानेश्वरी मेदगे, द्वितीय प्रतीक्षा कुडेकर व अक्षदा अरगडे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुस्तक भेट देऊन प्रोत्साहित करण्यात आले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.



**कथालेखन स्पर्धेतील सुप्रिया ठोकळ यांना सन्मानित करताना ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील.**

My Pune Gramin Edition
Aug 02, 2026 Page No. 5
Powered by: erelego.com